वर्ष- १२ | अंक- ३१ | मुंबई, मंगळवार,१६ जुन २०२६ ते २२ जुन २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

भारतीय कविता आणि गीतांवर ब्रिटीश सरकारने जेव्हा बंदी घातली होती

3 → आर्थिक प्रगतीचा ढोल का फुटला?

नागपूरच्या दर्ग्यात महिलेचा विनयभंग आणि धर्मांतरासाठी सक्ती... ६ जणांवर गुन्हा ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

बिभत्सतेचा कळस... थेट इमामाशी लग्न करायची ऑफर

नाशिकच्या टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रकरणी निदा खानच्या खुलाश्याने सर्वच हादरले

नाशिक, नाशिकच्या टीसीएस कंपनीतील लैंगिक छळ आणि कथित धर्मांतर प्रकरणात आता आरोपपत्र दाखल करण्यात आलं असून त्यातून अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. आरोपी दानिश शेखने त्याचे लग्न लपवले आणि नंतर तिला एका इमामशी लग्न करण्याचा सल्ला दिला, असा आरोप एका पीडितने केलाय. तिचे नाव बदलणे, कागदपत्रे गोळा करणे आणि तिचे धर्मांतर करण्याच्या कथित योजनेचाही आरोपपत्रात उल्लेख आहे.

नाशिकमधील आयटी कंपनीतील काही महिलांचे झालेले लैंगिक शोषण आणि कथित धर्म परिवर्तनाचा प्रयत्न झाल्याचे प्रकरण उघडकीस आल्यापासून राज्यात एकच संतापाची लाट उसळली आहे. या केसमध्ये एचआर निदा खानसह अनेकांना अटक झाली असून आता आरोपपत्र दाखल करण्यात आली आहे. त्यातून अनेक मोठे, धक्कादायक खुलासे झालेत. चार्जशीटमधील पीडित तरूणीच्या जबाबानुसार, आरोप दानिश शेख याने त्याचं लग्न झाल्याची आणि मुलं असल्याची माहिती पीडितेपासून लपवली होती.

मात्र जेव्हा तिला याबद्दल समजलं आणि तिने त्याच्याकडे विचारणा केली, माज्याशी आता लग्न कोण करणार असं तिने आरोपीला विचारलं असता त्याने दिलेलं उत्तर ऐकून ती हादरलीच. दानिशने कथितपणे तिला सांगितलं की, जर कोणीच लग्न करण्यास तयार झालं नाही ती त्यांच्या जमातीच्या इमाम साहिबांशी लग्न करू शकते. आरोपी तिचे नाव आणि धर्म बदलण्याचा कट रचत होते, असाही दावा पीडितेने केला. धर्मांतराची प्रक्रिया सार्वजनिक झाल्यास आपण पकडले जाऊ, अशी भीतीही आरोपींना वाटत होती, असंही तिने जबाबात म्हटल्याचं समोर आलं.

लग्नाचं सत्य समजताच वाद

पीडितेच्या जबाबानुसार, फेब्रुवारी 2026 मध्ये तिला एका अनोळखी नंबरवरून व्हॉट्सॲपवर कॉल आणि मेसेज आले. जेव्हा तिने तो नंबर दानिशला दाखवला, तेव्हा त्याने तो त्याचा घरचा नंबर असल्याचे सांगितले. नंतर दानिशने तो त्याच्या पत्नीचा नंबर असून त्याला दोन मुले असल्याचे कबूल केलं,असा आरोप पीडितेने केला. ते ऐकून पीडित तरूणी हैराण झाली. जेव्हा लोक तिला त्याच्या लग्नाबद्दल सांगायचे, तेव्हा तो तिला त्याकडे दुर्लक्ष करायला सांगायचा. सत्य समोर आल्यास ती त्याला सोडून जाईल या भीतीने मी घाबरलो, असं दानिशने तिला सांगितल्याचं पीडितेने म्हटलं.



इमाम साहेबांशी लग्न कर

आता माज्याशी लग्न कोण करणार, असाव पीडितेने त्याला विचारला. तेव्हा दानिशने कथितपणे सांगितले की त्यांच्या समाजात बहुपत्नीत्व सामान्य आहे आणि तो तिच्यासाठी कोणीतरी शोधून देईल. अगदीच जर कोणी सापडलं नाही तर तू आमच्या समाजातील इमामशी लग्न करू शकतेस, असंही दानिशने सांगितल्याचा आरोप पीडितेने केला. इमाम साहेब म्हणजे कोण असंही तिने दानिशला विचारला. तेव्हा दानिशने तिला सांगितले की ते त्यांच्या जमातीचे इमाम आहेत आणि त्यांची पत्नी एका मदरशात शिकवते व ती तिला इस्लामचे नियम आणि अरबी भाषा शिकवू शकते.

नामबदल आणि कागदपत्रं जमवण्याचा प्लान

याशिवाय, पीडितेने असा आरोप केला की, आरोपी तौसीफ अत्तारने तिला धर्मांतर करण्यास भाग पाडण्यासाठी मालेगावच्या एका टोळीचा उल्लेख केला होता. चार्जशीटनुसार , त्यानंतर दानिशने तिला तिची मूळ कागदपत्रे कंपनीत आणण्यास सांगितले. दानिशच्या सांगण्यावरून तिने तिची सर्व मूळ कागदपत्रे आणून त्याच्या बॅगेत ठेवली, असं पीडितेने पोलिसांना सांगितलं. तिच्या नावावर नवीन कागदपत्रे तयार झाली की तू नोकरीसाठी बाहेर जात आहेस, अस पालकांना सांग, असा सल्लाही दानिशने पीडितेला दिल्याचे तिने नमूद केलं.

मुंबई आणि मलेशियाला पाठवण्याची कथित चर्चा

दानिश आणि तौसीफ यांनी पीडितेच्या धर्मांतराविषयी कोणालाही कळू नये म्हणून मुंबईत तिच्यासाठी नोकरी शोधण्याबाबतही चर्चा केली होती, असं पीडितेने दिलेल्या जबाबात सांगितलं. एवढंच नव्हे तर तौसीफने तिला मलेशियाला पाठवण्याचाही सल्ला दिल्याचा आरोप तिने केला. जोपर्यंत तिला नोकरी मिळत नाही, तोपर्यंत ती त्याच्या नातेवाईकाकडे राहू शकते आणि तिथे इस्लामी प्रथांचे पालन सुरू ठेवू शकते असंही तौसीफने तिला सुचवल्याचं पीजितेने सांगितलं.दानिशने पीडितेचं, त्याच्या पहिल्या पत्नीशी, माहिरीनशी बोलणं करून दिलं होतं. नंतर, व्हॉट्सपवरील संभाषणात, माहिरिनने तिला भेटण्याची आणि इस्लामबद्दल काही गोष्टी समजावून सांगण्याची इच्छा व्यक्त केली असा आरोप पीडितेने केला. मात्र माहिरिनला आपलं बदललेले नाव कसे कळलं याबद्दल काळजी वाटत असल्याने पीडितेने ही भेट टाळली.

चार्जशीटमध्ये अनेक आरोपींची नावं

या कंपनीतील लैंगिक शोषण आणि कथित धर्मातरण प्रकरणात यापूर्वीच अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये दानिश शेख, तौसीफ अत्तार आणि निदा खान यांचा समावेश आहे. एआयएमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांचेही नाव आरोपपत्रात आरोपी म्हणून नमूद करण्यात आले आहे.त्यांनी निदा खानला आश्रय दिला होता असा तपास यंत्रणांचा आरोप आहे . महाराष्ट्र सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एक विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपपत्रात 100 हून अधिक साक्षीदारांचे जबाब समाविष्ट आहेत. कोणत्याही प्रकारच्या छळ आणि जबरदस्तीविरोधात त्यांचे शून्य-सहिष्णुता धोरण आहे आणि या प्रकरणात नाव असलेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याचं टीसीएसने म्हटलं होतं.

कंपनीतील धर्मांतर प्रकरणी निदा खानची कबुली



देशभरात चर्चेत असलेल्या टीसीएस कंपनीतील धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणाला आता नवं वळण मिळाल्याचे पहायला मिळत आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिने कबुली दिली आहे. तिने धर्मांतर करण्यासाठी प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे.

निदा खान हिच्या जबाबासह काही गंभीर बाबी विशेष तपास पथकाने दाखल केलेल्या दोषारोपपत्रात नमूद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित गुन्ह्यांच्या खटल्याची पहिली सुनावणी ९ जून रोजी होणार असल्याने प्रकरणाकडे लक्ष लागले आहे. तपासाशी संबंधित सूत्रांच्या माहितीनुसार, रक्ळने न्यायालयात सादर केलेल्या दोषारोपपत्रात, पीडित तरुणींचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी त्यांच्यावर मानसिक प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

यामध्ये काही धार्मिक प्रचारकांचे व्हिडिओ पाहण्यास प्रवृत्त करण्यात आल्याचा उल्लेख असल्याचे सांगितले जात आहे. तपास यंत्रणेनुसार, संशयित आरोपी निदा खान हिने चौकशीत काही लिंक पाठवल्याचा उल्लेख कथित जबाबात असल्याचा दावा करण्यात आला आहे.

'ब्रेनवॉश'चा आरोप; मानसिक दबाव टाकल्याचा दावा

देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याच्या तपासात पीडित तरुणीच्या मनात तिच्या धर्माबद्दल संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा तपासात समोर आला आहे. दोषारोपपत्रानुसार, पीडितेला विशिष्ट धार्मिक विचारसरणीशी संबंधित व्हिडिओ पाहण्यासाठी सातत्याने दबाव टाकण्यात आल्याचा आरोप आहे. ''धर्म स्वीकारल्यास मानसिक तणाव कमी होईल,'' अशा स्वरूपाचे समुपदेशन किंवा संवाद झाल्याचाही दावा तपासात नमूद करण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. याच प्रकरणात संशयित आरोपी दानिश शेख याच्यावर पीडितेला लग्नाचे आश्वासन देत शारीरिक व लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. तसेच पीडितेच्या पोशाखाबाबतही निर्बंध लादल्याचा दावा दोषारोपपत्रात करण्यात आला आहे. तिला विशिष्ट प्रकारचे कपडे परिधान करण्यास सांगण्यात आले तसेच धार्मिक पोशाख वापरण्याबाबत मार्गदर्शन केल्याचाही उल्लेख असल्याचे समोर आले आहे.

पाकिस्तान कनेक्शनचा दावा

या प्रकरणात काही पाकिस्तानी धार्मिक व्यक्तींशी संबंधित डिजिटल कंटेंटचा उल्लेख तपासात समोर आल्याचा दावा केला जात आहे. मात्र, तपास यंत्रणांनी अद्याप कोणतेही अधिकृत निष्कर्ष सार्वजनिकरीत्या जाहीर केलेले नाहीत. त्यामुळे या बाबींची सत्यता न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट होणे बाकी आहे.

दरम्यान, नाशिकमधील मुंबई नाका पोलीस ठाण्यात दाखल विविध गुन्ह्यांप्रकरणी ९ जून रोजी होणारी सुनावणी महत्त्वाची मानली जात असून, तपासातून आणखी कोणते खुलासे समोर येतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एक दोन नाही तर तब्बल 140 गर्लफ्रेंड...

सर्वांसोबत असं काही केलं की पोलिसही शॉक झाले

11 महिलांची पोलिस ठाण्यात लेखी तक्रार

डोंबिवली। एका तरुणाने एक दोन नाही तर तब्बल 140 तरुणींना गर्लफ्रेंड बनवले. प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तरुणींशी संबंध प्रस्थापित केले. त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या नावावर लाखो रुपयांची कर्जे काढून फसवणूक केली. या भामट्याला डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीचे नाव आदर्श म्हात्रे असे असून यापूर्वी त्याला नवी मुंबई पोलिसांनी अटक केली होती.



सांगली-3 भोंदू बाबाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

महापुरुषांचा संचार असल्याचं सांगत शरीरिक व आर्थिक फसवणूक करणाऱ्या सांगलीच्या विटा येथील तिघा भोंदूकडुन एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.या प्रकरणी तिघांवर विटा पोलीस ठाण्यामध्ये पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.((धक्कादायक म्हणजे पीडित मुलीला,तू मागच्या जन्मी नागिन होतीस,आणि संकेतबाबा नाग होता, त्यामुळे जन्मी लग्न व्हावं म्हणून तुझा जन्म झाला असं सांगत,तिघांनी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करत व्हिडिओ देखील काढल्याचं पोलीस तपासात समोर आले आहे,तसेच पीडित मुलीला व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन अत्याचार केल्याचाही समोर आले आहे.))त्याचबरोबर पीडित मुलीच्या वडिलांकडून पूजा व हवन करण्यासाठी सुमारे साडेचार लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याचाही प्रकार उघडकीस आला आहे.या प्रकरणी अटकेत असणाऱ्या भोंदू महेश मोहन बाबर, संकेत संदीप निकमआणि सूरज उपाध्ये या तिघांविरुद्ध पोक्सो अंतर्गत आणि आर्थिक फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आदर्श म्हात्रे हा पनवेल मधील रसायनी येथील राहणारा आहे. सोशल मीडियाच्या सुरुवातीला तरुणी सोबत मैत्री करून तो त्यांचा विश्वास संपादन करायचा. त्यानंतर प्रेमसंबंध निर्माण करून संबंधित तरुणींच्या नावावर विविध बँकांमधून कर्जे काढल्याचा आरोप आहे. तपासात आतापर्यंत 140 हून अधिक तरुणींना त्याने आपल्या जाळ्यात ओढल्याची माहिती समोर आली आहे. यापैकी 11 तरुणींनी पुढे येऊन अधिकृत तक्रारी दाखल केल्या असून आणखी काही पीडित महिला तक्रार देण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

विशेष बाब म्हणजे फसवणुकीला बळी पडलेल्या अनेक महिला उच्चशिक्षित असून विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. आर्थिक क्षेत्र, कॉर्पोरेट आणि व्यावसायिक क्षेत्रातील महिलांची संख्या यामध्ये लक्षणीय असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. नवी मुंबई पोलिसांनी अटक केल्यानंतर डोंबिवलीतील एका तरुणीनेही फसवणुकीची तक्रार दिल्याने मानपाडा पोलिसांनी आदर्श म्हात्रेला ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरोधातील गुन्ह्यांचा तपास सुरू असून आणखी पीडित महिला पुढे येण्याची शक्यता असल्याने फसवणुकीचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे सोशल मीडियावरील ओळखी आणि ऑनलाइन नातेसंबंधांच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीचा गंभीर मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉलमधून तरुणीचे अश्लील फुटेज?

घटनेचा छडा लावण्यासाठी पोलिसांचा 1350 किमी प्रवास...

नाशिक। हल्ली मैत्री आणि ओळखीची समीकरणं ही बहुतांशी सोशल मीडियावर आधारल्याचं पाहायला मिळतं. मात्र, याच सोशल मीडियाच्या माध्यमातून फसवणूक, नोकरीचं आमिष, आक्षेपार्ह फोटो व्हायरल करणं ही आणि अशी अनेक गुन्हेगारी कृत्यसुद्धा घडताना दिसतात. असाच एक प्रकार नाशिकमध्ये घडला. ज्याचं कनेक्शन थेट उत्तराखंडपर्यंत असल्याचं पाहायला मिळालं. नाशिकमध्ये पुन्हा खळबळ, यावेळी काय घडलं? 'शिया भास्कर' या नावाने बनावट इन्स्टाग्राम प्रोफाईल तयार करून संशयित आरोपी अजीम अहमद, राहणार गदरपूर, उत्तराखंड याने नाशिकच्या बागलाण मधील तरुणीशी संपर्क साधला होता. तिला नोकरीचं आमिष दाखवलं. यानंतर आरोपीने वारंवार व्हिडिओ कॉल करून तिला त्रास दिला. तरुणीने प्रतिसाद देणं बंद केल्यानंतर आरोपीने व्हिडिओ कॉलवरील स्क्रीनशॉट एडिट करून अश्लील फोटो तयार केले. हे फोटो तिच्या होणाऱ्या पतीसह नातेवाईकांना पाठवून बदनामी करण्याची धमकी देण्यात आली. तसंच तिच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार करून तिची खासगी माहिती व्हायरल करण्यात आली. तरुणीची 30 हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आणि प्रकरण विकोपास गेलं. अखेर या प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल 1350 किलोमीटरचा प्रवास करून पोलीस उपनिरीक्षक अतुल बोरसे, पोलीस हवालदार योगेश शेवाळे, पोलीस शिपाई कदम यांच्या पथकाने उत्तराखंडमधील गदरपूर इथं जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेतलं. सदर कारवाईनंतर आरोपीला सटाणा इथं आणण्यात आलं. जिथं त्याच्याकडून वापरण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक पुरावे जप्त करण्यासाठी आणि सखोल तपासासाठी अटक करण्यात आली. पुढील तपास सटाणा पोलीस करत असून आता त्यानं हा गुन्हा नेमका कसा आणि का केला याबाबतची माहिती समोर येईल. नाशिकमध्ये वाढती गुन्हेगारी... काही दिवासंपूर्वीच नाशिकमधील अशोक खरात प्रकणाचा खुलासा झाला आणि त्यानंतर मागोमाग नवनवीन खुलासे होताच एकच खळबळ माजली. खरातचे कारनामे यंत्रणांनाही धक्का देऊन गेले. मागोमागच नाशिकमधील एकका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीतील धर्मांतरण आणि लैंगिक अत्याचार प्रकरणानंसुद्धा सामान्यांना धक्का दिला. कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या या घटन पचत नाहीत तोच आता याच नाशिकमधून पुन्हा एकदा आणखी एका गुन्ह्यानं डोकं वर काढलं. एक असा गुन्हा ज्याची उकल करण्यासाठी पोलिसांनी हजारो किमीचा प्रवास केला. ही सर्व प्रकरणं पाहता एकंदरच गुन्हेगारांना कठोर शिक्षा देत कायद्याचा धाक वाढवण्याचीच गरज आहे असा सूर सामान्य जनता आळवतेय.





लेकाच्या बर्थडेच्या तोंडावर रेल्वे पोलिसाचा झालेला अंत वर्षभरानंतरही पत्नी नोकरीच्या प्रतीक्षेत

ठाणे। अवघ्या चार वर्षाच्या संसारानंतर अर्ध्यावर डाव मोडून पत्नी आणि मुलाला मागे सोडून गेलेल्या रेल्वे पोलिस कर्मचारी विकी मुख्यदल यांच्या मृत्यूला आज वर्ष पूर्ण झाले. मात्र पतीच्या आठवणीत हरवलेल्या दीपाली अजूनही धक्क्यात आलेत. आपल्या एकुलत्या एका मुलाच्या भविष्यासाठी पतीच्या जागेवर नोकरी मिळण्याची त्यांना अपेक्षा आहे. त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाली असून मेडिकल नंतर नोकरीचे नेमणूक पत्र दिले जाणार असल्याचे पोलिस खात्याकडून सांगण्यात आले.

रेल्वे पोलिस दलात चार वर्षापासून नोकरी करणारे विकी मुख्यदल हे नेहमीप्रमाणे ९ जून २०२५ रोजी ठाणे रेल्वे स्थानकात ड्युटीवर जात होते. कल्याण ते ठाणेदरम्यान मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ इतर काही प्रवाशांसह रेल्वेतून खाली पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता.

पतीच्या मृत्यूनंतर एकट्या पडलेल्या दीपाली या पतीची बॉडी घेऊन जालना येथील घरी गेल्या होत्या. तेव्हापासून त्या आपल्या आई वडिलांकडे राहत असून मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मिळणाऱ्या मदतीवर पत्नीसह आई वडील आणि नातेवाईकांनी दावा केल्यानंतर ही रक्कम सरकारच्या तिजोरीतच पडून आहे. तर रेल्वे प्रशासनाकडून अद्याप जाहीर केलेली मदत त्यांना मिळालेली नाही.

पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,१६ जुन २०२६ ते २२ जुन २०२६

भारतीय कविता आणि गीतांवर ब्रिटीश सरकारने जेव्हा बंदी घातली होती





भारताच्या स्वातंत्र्यापूर्वीची 40 वर्षं आंदोलनांनी भारलेली होती. या काळात लढे उभे करण्यात आणि लोकांचा सहभाग वाढवण्यात कविता, गाणी, पोवाडे यांचा मोठा वाटा होता. यातील बऱ्याचशा गीतांवर ब्रिटीश सरकारने बंदी आणली होती.

भारतातल्या अनेक भाषांमधील पुस्तकं जप्त केली गेली. या गाण्यांमध्ये असं काय होतं की ब्रिटिशांना 'देशाची सुरक्षा धोक्यात येईल' असं वाटत होतं? ब्रिटीश काळात बंदी घातलेल्या काही विद्रोही पुस्तिकांचा खजिना नॅशनल आर्काईव्ह्ज ऑफ इंडियाने लोकांसाठी खुला केला होता. महाराष्ट्रातल्या कोणत्या गीतांवर बंदी आणली होती, याचा लेखाजोखा.

हा लेख सर्वप्रथम 2022 साली बीबीसी मराठीच्या वेबसाईटवर प्रकाशित झाला होता. आज जागतिक कविता दिन, त्यानिमित्ताने हा लेख पुन्हा प्रसिद्ध करत आहोत.

परवशता पाश दैवे, ज्यांच्या गळा लागला,
सजिवपणे घडती सारे,
मरणभोग त्याला...

परवशता म्हणजे गुलामगिरी. ब्रिटीश सत्तेविरोधातलं हे नाट्यगीत. 'रणदुंदुभि' या नाटकातलं हे गाणं मास्टर दीनानाथ मंगेशकर ब्रिटीश गव्हर्नरसमोर गात होते. या गाण्याचा अर्थ गव्हर्नरने दुभाषाकडून जाणून घेतला.

सुरूवातीला लोकमान्य टिळकांचा प्रभाव असणाऱ्या वीर वामनराव जोशी यांनी ब्रिटीश सत्तेविरोधात हे गीत लिहिलं होतं. ते ब्रिटीश अधिकाऱ्यांसमोरच गाऊन दाखवण्याचं धाडस मास्टर दिनानाथांनी केलं होतं. तो काळ होता संगीत नाटकांचा आणि ब्रिटीश सत्तेविरोधातल्या बंडाची ठिणगी पडण्याचा.

या गाण्यावर नंतर बंदी आणली गेली. पण वीर वामनराव जोशी थांबले नाहीत. राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांना तुरूंगात जावं लागलं. पुन्हा बाहेर आल्यावर त्यांनी आपली लेखणी स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी चालूच ठेवली. पुढे 1920 नंतर त्यांनी महात्मा गांधीच्या सत्याग्रह चळवळीत असतानाही त्यांनी याच लेखणीसाठी कारावास भोगला.

इतिहास संशोधक डॉ. अरविंद गणाचारी याविषयी सांगतात, 'नाटकाच्या सुरूवातीला म्हटली जाणारी नांदी हा गेय प्रकार. पूर्वी नाट्यदेवतेला किंवा गणपतीला नमन करून ही नांदी होत होती. पण 1910-20 च्या दशकांमध्ये स्वातंत्र्यदेवतेला उद्देशून नाटकांची नांदी होऊ लागली. इतका प्रभाव मोठा होता.

'एक श्लोकी गीता'वर देशद्रोहाचा आरोप

देशद्रोहाचा आरोप ठेवता येईल असं साहित्य शोधून काढणं ही ब्रिटिशांसमोर मोठी डोकेदुखी झाली होती. 1870 मध्ये आलेल्या इंडियन पिनल कोड 124-अ अंतर्गत 'सरकारविरोधात असंतोष निर्माण करण्याचा किंवा त्या असंतोषाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न म्हणजे देशद्रोहाचा गुन्हा.

भारतीय भाषेतून येणाऱ्या सरकारविरोधी देशद्रोही साहित्यावर नजर ठेवण्यासाठी ओरिएंटर ट्रान्सलेटर म्हणून एका विशेष अधिकाऱ्याची नेमणूक 1890 पासून केली जाऊ लागली.

एरव्ही धार्मिक वाटणाऱ्या साहित्यातूनही राष्ट्रभक्तीची अभिव्यक्ती होत होती. त्यामुळे हे फारच बारकाईने पाहण्याचं काम झालं होतं.

कवी केशवसुत यांचे वडील केशव शास्त्री दामले यांचं एक श्लोकी गीता असंच कायद्याच्या कचाट्यात सापडलं आणि त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला गेला. बाबाराव सावरकर यांच्या 4 कविता या राम, विष्णू, कृष्ण यांच्यावर होत्या पण भारताच्या स्वातंत्र्याशी संबंधित होत्या. सावरकरांवर ब्रिटीश सरकारच्या विरोधात कट आणि युद्ध पुकारण्यास प्रवृत्त करणं असे आरोप ठेवण्यात



आले. त्यांना कारावास भोगावा लागला.₹ अशी अनेक उदाहरणं डॉ. अरविंद गणाचारी देतात.

भारतीयांच्या मनात स्वराज्याची जाणीव तयार होत असताना ब्रिटीश सरकार विद्रोही आणि 'असंतोष' पसरवणारं साहित्य ताब्यात घेत होतं.

जय जय विद्यावंध गणराज,
जयजय टिळक गांधिमहाराज
।।धृ०।।

स्वराज्य मिळण्या दस लाखांचे तत्व सांगतो आजीं ।।
सर्वस्वाची करि बा, होळी
स्वराज्यकुंडामाजीं ।।१।।
ईश्वर व्हाया, निर्जिव फत्तर
घाव टाकिचे साही ।।
वृतिच्छेदा भिऊनि बापा,
स्वराज्य मिळणें नाहीं ।।२।।

हे गीत ब्रिटीश सरकारने जप्त केलेल्या 'प्रभात फेरी- मराठी अनेक कवींची राष्ट्रीय काव्य माला' या पुस्तिकेतील आहे. नोव्हेंबर 1930 मध्ये ब्रिटीश दरबारी जमा झाल्याची नोंद त्यावर आहे.

देशद्रोही साहित्य खुलं केलं गेलं

देशाच्या सुरक्षेला धोका असं समजून अशा अनेक पुस्तकांवर ब्रिटीश सरकारने बंदी जाहीर केली. 1907 ते 1940 या कालावधीत ब्रिटिशांनी बंदी आणलेलं साहित्य अनेक वर्षं भारताच्या नॅशनल अर्काईव्हजमध्ये आणि युकेमधल्या ब्रिटीश लायब्ररीमध्ये बंदिस्त असल्यासारखं होतं.

डॉ. एन. गेराल्ड 1976 साली यांनी या वादग्रस्त साहित्यावरील धुळ झटकली आणि ते प्रकाशझोतात आणलं. पण त्यांनी प्रामुख्याने उत्तर भारताच्या संदर्भात इंग्लिश, हिंदी, उर्दू आणि पंजाबी भाषांमधील साहित्याचा वेध घेतला होता. त्याशिवाय मराठी, गुजराती, बंगाली, कन्नड, ओडिया, सिंधी, तमिळ आणि तेलुगू या भाषांमधीलही बंदी असलेलं साहित्य ब्रिटीश सरकारच्या अखत्यारित जमा झालं होतं. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने भारत सरकारने ऐतिहासिक आणि वादग्रस्त ठेव्यातील काही पुस्तिका लोकांसाठी खुल्या केला.

या जप्त केलेल्या पुस्तिकांमध्ये ब्रिटिशांनी केलेल्या अन्यायाची गीतं शाहिर आणि कवींनी रचलेली आहेत. त्यात लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजगोपालाचारी यांच्यासारख्या नेत्यांची, प्रसंगांची वर्णनं दिसतात. 'Anti-british propoganda' म्हणजेच ब्रिटिशांविरोधी प्रचार करणारं साहित्य असं त्याचं स्वरूप दिसतं.

जालियनवाला बाग हत्याकांडानंतर म्हणजे 13 एप्रिल 1919 नंतर असंतोष वाढत होता, त्याला चेतवायचं काम या गीतांनी केलं होतं. बंदी घातलेल्या गीतांमध्ये समाजवादी आणि कम्युनिस्ट विचारांचे कवी, गीतकार यांचा समावेश सर्वाधिक होता.

प्रभातफेरीची गीतं

जवाहरलाल नेहरूंनी 31 डिसेंबर 1929 साली काँग्रेसच्या अधिवेशनात 26 जानेवारी हा दिन स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचं आवाहन केलं.


फेब्रुवारी 1930 मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची घोषणा झाली. दारूबंदी, शेतसाऱ्यापासून मुक्त, मिठावरचा कर रद्द करा, स्वदेशी मालाला संरक्षण असे मुद्दे लावून धरले जात होते. जंगल सत्याग्रहात लढे उभे राहात होते. मार्च 1930 मध्ये मीठाचा सत्याग्रह करण्यासाठी गांधीजींनी दांडी यात्रा काढली. महात्मा गांधींनी कल्पकतेने, प्रतीकात्मक केलेला मीठाचा सत्याग्रह आणि सविनय कायदेभंगाची चळवळ यामुळे ब्रिटीशांच्या विरोधात वातावरण पेटायला सुरूवातच झाली.

जिल्ह्याच्या ठिकाणी, गावगावांमध्ये सत्याग्रह आणि प्रभातफेऱ्यांना उधाण आलं होतं. प्रभातफेरी काढायची, गाणी म्हणायची आणि झेंडावंदन करायचं असा कार्यक्रम असे. दारूबंदीची गाणी गायली जात होती.

मदिरेचा प्रताप या कवितेत म्हटलंय-

नकोरे छंद धरूं मदिरेचा ।
करितसे नाश सकलांचा
।।धृ०।।
मदिरा मोहक वरि वरि दिसते
।।
रोग भयंकर शरिरीं आणिते ।।

देशभरातून काँग्रेसला मिळणारा पाठिंबा झपाट्याने वाढू लागला. बहिष्कार आणि रस्त्यावर उतरून निदर्शनं देखील सर्रास होऊ लागली. या असंतोषाने भरलेल्या वातावरणात प्रक्षोभक साहित्याचा मोफत होणारा प्रसार ही ब्रिटीशांसाठी सर्वात मोठी डोकेदुखी ठरत होती. हा सगळा आशय 1930 ते 1932 दरम्यान जप्त केलेल्या साहित्यात दिसतो.





भारतीय कविता आणि गीतांवर ब्रिटीश सरकारने जेव्हा बंदी घातली होती सकाळी म्हणजेच प्रभातफेरीला गायल्या जाणाऱ्या गीतांचा खेडोपाडी प्रसार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पुस्तिका छापल्या जात होत्या. ती गीतं खासगी वह्यांमधून घेतली जात होती त्यामुळे ती नेमकी कोणी लिहिली याचा उल्लेख त्यात सापडत नाही. त्या सुमारास या पुस्तिकांची किंमत 1 आणा होती. स्वातंत्र्याचं आंदोलन अहिंसात्मक पद्धतीने छेडण्यात या गीतांचं योगदान काय होतं याविषयी राजकीय विश्लेषक डॉ. चैत्रा रेडकर सांगतात.

गांधीजींचा अहिंसक विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभात फेऱ्या समूहगीते यांचा वापर त्यांनी उभारलेल्या आंदोलनाच्या दरम्यान आणि आधीही केला जात असे. भाषणं किंवा लेखांपेक्षा गाणी लक्षात ठेवायला सोपी असतात.

समूहाने एकत्र येऊन गाणी म्हटली, की एकात्मतेची भावना निर्माण होते आणि सकाळी ऐकलेली गाणी माणूस दिवसभर गुणगुणत राहातो. या दृष्टीने प्रभात फेऱ्या आणि त्यात म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांना आंदोलन लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने खास महत्त्व होतं. या पुस्तिकांवर आणि गाण्यांवर बंदी का आली हे समजून घ्यायचं तर या पुस्तिका कधी प्रकाशित झाल्या ते बघावे लागेल.

मिठाच्या सत्याग्रहात सहभागी झालेले मुंबईतले आंदोलकफोटो स्रोत,ल्वछळडठ अफ्छलक्ष्ए

फोटो कॅप्शन,मिठाच्या सत्याग्रहात सहभागी झालेले मुंबईतले आंदोलक

'मीठाची मोहीम' हे पुस्तक जून 1930 मध्ये प्रकाशित झालं. 'गांधीजींचा महामंत्र' हे पुस्तक 1930 च्या उत्तरार्धातच प्रकाशित झाले असणार. म्हणजे या दोन्ही पुस्तिका दांडी यात्रा पार पडल्यावर प्रकाशित झाल्या आहेत. दांडी यात्रा सुरू होण्यापूर्वी या आंदोलनातून कितपत प्रतिसाद मिळेल याविषयी ब्रिटीश शासन साशंक होतं. मात्र प्रत्यक्षात मिठाच्या सत्याग्रहाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. लहान-मोठे, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, शेतकरी-कामगार सगळेजण आंदोलनात सहभागी झाले. तुरुंग अपुरे पडू लागले. त्यामुळे आंदोलनाशी निगडीत सर्व गोष्टींवर बंदी घालणं, अटकाव करणं असं दबाव सत्र ब्रिटिशांनी सुरू केलं. या पुस्तिकांवरील बंदी हा याचाच धोरणाचाच भाग होता, असं विश्लेषण डॉ. रेडकर करतात. भारतीय कविता आणि गीतांवर ब्रिटीश सरकारने जेव्हा बंदी घातली होतीफोटो स्रोत,अछअट

'राष्ट्रीय पोवाडा' ही पुस्तिकाही या साहित्यात सापडते. शाहिर भिकाजी सखाराम गायकवाड प्रस्तावनेत लिहितात- 'स्वराज्य-स्वधर्म या करता ज्यांनी आपले सर्व आयुष्य खर्च करून स्वतःचे प्राणही धोक्यात घातले अशा शूरवीरांचे गुणवर्णनात्मक व देशाविषयीचेच स्वाभिमान उत्पन्न करणारी जी काव्यें, ज्यांना आपण पोवाडे म्हणते तेच खरे महाराष्ट्र संगीत. आपण पूर्वी कसे होतो, आज कसे आहोत याची जाणीव उत्पन्न करण्यास या सारखे दुसरे कोणतेच संगीत नाही.' या गीतांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांना अपेक्षित असलेल्या स्वराज्याची वर्णनं केली गेली. वेगवेगळे फॉर्म वापरले गेले. आरती, भोपाळी, भजन, प्रार्थना अशा पारंपरिक प्रकारात राष्ट्रभावना चेतवणारी गाणी लिहिली गेली. भारतीय कविता आणि गीतांवर ब्रिटीश सरकारने जेव्हा बंदी घातली होती मीठाचा सत्याग्रह केवळ पुरुषांच्या सहभागापुरता मर्यादित राहू नये तर महिलाही सहभागी झाल्या पाहिजेत म्हणून कमलादेवी चटोपाध्याय यांनी गांधीजींचं मन वळवलं होतं. पुढे सत्याग्रहात खास करून दारुबंदी आंदोलनात महिलांचा सहभाग वाढला. बंदी आणलेल्या एका स्वदेश गीतात म्हटलंय-

प्रिय भगिनींनो विनती करितसे
स्वदेस प्रीती मनी धरा ।
सोडुनी द्या हौस मनींची देशी
कंकणे करी भरा ।।

खान्देशातील धुळ्यासारख्या भागात सविनय कायदेभंगाच्या चळवळीने कसं रान पेटवलं होतं याची साक्ष सांगणारा हा पोवाडा. खान्देशचे शाहीर सिद्राम बसप्पा मुचाटे यांच्या शाहिरीने हा लढा दुमदुमला असावा.

धुळ्यातल्या मुकटी गावातल्या लोकांनी सत्याग्रहात उडी घेतली. शंकर ठकार यांच्या नेतृत्वाखाली परदेशी कापडाची होळी केली गेली. त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांना सत्याग्रहात भाग घेतला म्हणून गुन्हा दाखल केला गेला. अशा स्वातंत्र्य सैनिकांची व्यक्तिमत्व शाहीर सिद्राम यांनी उभी केली. एका पोवाड्यात ते म्हणतात-

दडपशाहीची गोळी सुटली,
खाक तुम्ही होणार? ।
त्या गोळीस्तव ढाल छातीची
कोण कोण करणार ।।
कोणाच्या हातून खून झाला?

1942 च्या 'चले जाव' आंदोलनात देशातलं वातावरण पेटलं होतं. कय्यूर हुतात्मांची वीरकथा या बंदी घातलेल्या पुस्तकात एक गीत आहे. कर्नाटक-केरळच्या सीमेवरील कासारगोडातल्या कय्यूर खेड्यामधील लढवय्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना 29 मार्च 1943 मध्ये ब्रिटिशांनी फाशी दिली. त्यावेळी चाललेला खटला गाजला होता.

फाशीनंतर 'कय्यूर वीरांना लाल सलामी' हे बंगालमधल्या कॉम्रेड्सनी कवितामय संदेश लिहिला.

विजयी भाइहो तुम्हां सलामी ।
दुनिया सारी लाल रंगली ।।
मायभूमीच्या सीमेवरती ।
रक्तपिपासू फॅशिस्टांची ।।
गृध्रे पूवेर्ला वावरती... ।
नसानसांतुनी तुमच्या रक्ती ।।
शत्रू विनाशी लहरे स्फूर्ती ।
तुम्हा भाइहो लाल सलामी ।।

या गीताची पार्श्वभूमी अशी होती की कय्यूरमध्ये शेतकऱ्यांची सभा होणार होती. मार्च 1941 मधील ती सभा सरकारच्या विरोधात होती. तिला दडपण्यासाठी शेतकऱ्यांच्या घरांची झडती घेण्यात आली होती. त्याचा राग शेतकऱ्यांच्या मनात होता. त्यासाठी निदर्शनं झाली आणि जंगी मिरवणूक काढली गेली. त्यात दगडफेक सुरू झाली आणि त्यात एक पोलीस कॉन्स्टेबल मरण पावला.

त्यात कय्यूरमधल्या काही जणांना अटक झाली. चार जणांवर या गुन्ह्याचा ठपका ठेवण्यात आला. आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना फाशी दिली जाऊ नये यासाठी कम्युनिस्टांनी अखिल केरळ कय्यूर दिन घोषित केला. त्यावेळी मोठी मोहीम छेडली गेली. सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे या मोहिमेत कम्युनिस्टांसोबत काँग्रेस आणि मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांनीही सहभागी होत फाशी रद्द व्हावी अशा घोषणा केल्या, असं या पुस्तकात म्हटलंय.

कय्यूर हुतात्मा दिनाचा कार्यक्रम याच पुस्तकात खटल्याविषयी सविस्तर वर्णन आहे. मंगळूरच्या सेशन कोटार्ने या खटल्याचा निकाल दिला.

''पण याच चार कय्यूर आरोपींनीच गुन्हा केला होता काय? याचें उत्तर खुद्द सेशन जजनेंच आपल्या जजमेंटमध्ये लिहून ठेवले आहे. ज्यांत अनेक लोकांनी भाग घेतला आहे अशा निदर्शनांत प्रत्यक्ष खून कोणी केला याचा निवाडा करणे अशक्य काय आहे व तो माणूस कोटार्पुढे आणलाही केला नसण्याचा संभव आहे; पण हा भयानक खून असल्यामुळे सजा देणे जरूर आहे, अशी त्यांनी स्पष्ट कबूली दिली आहे. या चार आरोपींना फांसावर लटकवताना प्रत्यक्ष त्यांनी गुन्हा केला आहे किंवा नाही हे सिद्ध करण्याची मुळी जरूरीच नाही असे भारतमंत्री मिस्टर ॲमिरी यांनी जाहीर केले आहे. सजेचे समर्थन करताना त्यांनी ब्रिटीश पार्लमेंटात खालील उद्गार काढले- प्रत्यक्ष कोणाच्या हातून खून झाला याचा कधीही पत्ता लागला तरी हरकत नाही.'' अखेर व्हॉईसरॉयनी दयेचा अर्ज फेटाळल्यानंतर त्यांना फाशी झाली. या सर्व घडामोडींचं सविस्तर वर्णन म्हणजे सरकारविरोधी भडकलेल्या आगीत तेल ओतण्यासारखंच होतं. तेव्हा ब्रिटीशांनी 1943 मध्ये हे पुस्तक ताब्यात घेतलं.

चिमूरचं हत्याकांड, नंदूरबारचा गोळीबार, जळगावचा सत्याग्रह अशा अनेक ठिकाणच्या स्वातंत्र्य लढ्यांची ओळख या बंदी आणलेल्या पुस्तकांमधून होते. ब्रिटिशांनी या गीतांवर बंदी आणताना 'देशाच्या सुरक्षेला धोका' हे शब्द वापरले होते. पण देशातल्या सत्तेला अशा सेन्सॉरशीप आणून आणि देशद्रोहाचे आरोप ठेवूनही हा विरोध थोपवता आला नाही, हा इतिहास. या ऐतिहासिक साहित्यावर अजूनही म्हणावं तसं संशोधन झालेलं नाही, असं इतिहासकार मानतात.

संपादकीय

आर्थिक प्रगतीचा ढोल का फुटला?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला काटकसरीचं आवाहन केल्यापासून देशभरात चर्चांना उधाण आलंय. सोशल मीडियावर लोका सांगे ब्रम्हज्ञान असा ट्रेंडही जोरात सुरू झालाय. नाक्यावरील कटींगच्या टपरीवर बसलेल्या सामान्यातल्या सामान्य माणसापासून ते अर्थतज्ज्ञांपर्यंत प्रत्येकजण या काटकसरीमागं लपलेला गूढ अर्थ शोधण्याचा प्रयत्न करू लागलाय. भविष्यातल्या आर्थिक संकटाची तर ही चाहूल नाही ना? भाजप वाजवत असलेला आर्थिक प्रगतीचा ढोल का फुटला, असे प्रश्न लोक उपस्थित करत आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधी तेलंगणा आणि त्यानंतर गुजरातमध्ये लागोपाठ दोन दिवस केलेल्या भाषणातून देशवासीयांना काटकसर हीच देशभक्ती असल्याचं म्हणत उपदेशाचे डोस पाजलेत. पेट्रोल-डिझेल, गॅस जपून वापरा, कार पुलींग करा, सार्वजनिक वाहनांचा वापर करा. वर्क फ्रॉम होम-ऑनलाईन मिटिंग्ज एवढंच नाही तर ऑनलाईन वर्ग घेण्याचं आवाहनही पंतप्रधान मोदींनी शाळांना केलंय. परंतु, सत्ताधारी मंत्री, नेते, प्रशासकीय अधिकारी, बिझनेसमन यांचा बडेजाव प्रत्यक्ष डोळ्यांनी पहात असल्यानं हे उपदेशाचे कडवट डोस सर्वसामान्यांच्या पचनी पडणं सद्यस्थितीत तरी अवघड असल्याचं दिसतंय. कारण, देशवासीयांना उद्देशून भाषण केल्याच्या दुर्सयाच दिवशी पंतप्रधान स्वतः सोमनाथ मंदिराच्या कार्यक्रमात मोठ्या लवाजम्यासह गेले होते. तिथं त्यांनी नेहमीच्या स्टाईलनं दणकून रोड शो केल्याचंही लोकांनी पाहिलं.उत्तर प्रदेशातला भाजप नेता सौभाग्य सिंह ठाकूर पाठ्यपुस्तक मंडळाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारण्यासाठी उज्जैन ते भोपाळ असा 700 गाड्यांचा ताफा घेऊन गेला. मुंबईतही भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम पूर्व उपनगरातल्या नालेसफाईची पाहणी करण्यासाठी 25 गाड्यांचा ताफा घेऊन गेल्याचं म्हटलं जातंय. या दोघांच्याही ताफ्याचे फोटो प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेत. त्याचवेळी आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीलाही केंद्रीय मंत्रिमंडळासह भाजपशासित व मित्र पक्षांच्या सरकारचे मुख्यमंत्री, इतर मंत्री व नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काही मिनिटांच्या कार्यक्रमासाठी हे सर्वजण चार्टर्ड प्लेन व पुढे गाड्यांचा ताफा घेऊन गेले होते. स्वतः पंतप्रधान आणि सरकारमधील मंत्री, प्रशासकीय अधिकारी, नेते मंडळीच या आवाहनाला हरताळ फासत असतील, तर सर्वसामान्यांकडूनच ह्यात्यागाचीह्न अपेक्षा का? असे प्रश्न यामुळेच उपस्थित केले जात आहेत. त्यात अर्थात चुकीचं काही नाही. याच काळात सोशल मीडियावर देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, त्यानंतर इंदिरा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांनीही जनतेला उद्देशून वेळोवेळी अशी काटकसरीची आवाहने केल्याच्या पोस्ट व्हायरल होऊ लागल्या. त्यातील द हिंदूची इंदिरा गांधी यांची सोने खरेदी न करण्याची पोस्ट फॅक्ट चेकमध्ये तपासली असता फसवी निघाली.लाल बहादूर शास्त्री यांनी काटकसरीची सुरुवात स्वतःपासून केल्याचे दाखलेही पुढं आले. देशाला नुकतंच स्वातंत्र्य मिळालेलं होतं, चीन-पाकिस्तानसोबत लागोपाठ युद्ध झाली होती, उद्योगधंदे वाढीस लागायचे होते. रोजगाराचे प्रश्न होते, त्यावेळची देशाची सामाजिक-आर्थिक स्थिती वेगळी होती. भाजप काँग्रेसशी या पातळीवर तुलना करत असेल, तर मागच्या 12 वर्षांमध्ये आर्थिक प्रगतीच्या नावानं ढोल का बडवले? असे उलट प्रश्नही यामुळं विचारले जाऊ लागले. जनतेकडून संतप्त प्रतिक्रिया उमटल्यानंतर आता कुठं उपरती होऊन पंतप्रधान मोदींसह सर्वच राज्य सरकारांनी आपल्या ताफ्यात कपात करण्याचं ठरवलंय. मोदी दोनच गाड्यांचा ताफा स्वतःसोबत ठेवतील. महाराष्ट्रातही मुख्यमंत्र्यांच्या परवानगीशिवाय विमान प्रवास करता येणार नाही. हे निर्णय नक्कीच स्तुत्य म्हणावे लागतील. पण, या काटकसरीनं प्रश्न खरोखरच सुटणार आहेत का?ही सर्व काटकसर प्रामुख्यानं इंधनांशी संबंधित आहे. अमेरिका-इराण युद्धामुळं निर्माण झालेली इंधन टंचाई हे या काटकसरीमागचं महत्त्वाचं कारण आहे. खरं तर अमेरिका-इराण संघर्ष आता बंयापैकी निवळलेला आहे. इंधन वाहतुकीचा प्रमुख मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनीही पुढच्या दोन-तीन महिन्यात म्हणा किंवा जेव्हा युद्धविराम होईल तेव्हा खुली होईल. त्यामुळं इंधनाचा वापर जपून करा हे आवाहन पंतप्रधान मोदींनी खरं तर अडीच महिन्यांपूर्वी म्हणजे युद्ध सुरू झालं त्याचवेळी करणं अपेक्षित होतं. परंतु तसं केल्यास 5 राज्यांच्या निवडणुकांत फटका बसेल, याच भीतीनं हे टाळण्यात आलं. जगातील इतर देश अगदी पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार, इंडोनेशिया सरकारी खर्चात कपातीच्या उपाययोजना करत असताना मोदी सरकार निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र होतं. देशावर भयंकर आर्थिक संकट घोंगावत असल्याचे संकेत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी देत असताना देशात कुठंही इंधन टंचाई नाही, अर्थव्यवस्था सुरळीत असल्याचे दावे सरकारकडून केले जात होते. एवढंच नाही तर विरोधक जाणीवपूर्वक अफवा पसरवत असल्याचे आरोपही सरकारकडून करण्यात आले. परंतु दोन महिन्यांपूर्वी जे विरोधक म्हणत होते, त्याचाच कित्ता आज सरकारला गिरवावा लागत आहे. या सर्व इंधन टंचाईमागे मोदी सरकारची चुकलेली रणनीती आहे, असे अर्थतज्ज्ञ म्हणत आहेत. कोविडपासून भारत रशियाकडून स्वस्तात कच्चं तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करत होता, हे इंधन रिफाईन करून युरोपियन देशांना विकत होता. या 3 ते 4 वर्षांत इंधनविक्रीतून तेल कंपन्यांनी प्रचंड नफा कमावला. परंतु या नफ्याचा कुठलाही लाभ भारतीय ग्राहकांपर्यंत पोहोचवला नाही. कच्च्या तेलाचे दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रति बॅरल 70 ते 80 डॉलरदरम्यान असताना भारतात पेट्रोल-डिझेलचे दर कमी होण्याऐवजी वाढतच होते आणि आता हे दर 120 डॉलर प्रति बॅरल पोहोचताच उत्पादन शुल्क कपात करून तेल कंपन्यांचा तोटा कमी करण्याचा सर्वात पहिला प्रयत्न झाला. त्यानंतर हा तोटा आता सर्वसामान्यांच्या खिशातून भरून काढण्याचा सरकारचा इरादा आहे. हे तर झालं तत्कालिक प्रश्नाचं. ही इंधनटंचाईची समस्या आज ना उद्या सुटेल. असं असताना पंतप्रधान मोदींनी पुढचं वर्षभर सोनं खरेदी करू नका, परदेशी प्रवास, लग्नकार्य टाळा, खाद्य तेल-खताचा वापर कमी करा, असं आवाहन केलं. यामागचं नेमकं कारण काय? तर त्यात देशाची आटत चाललेली परकीय गंगाजळी हेच चिंतेचं प्रमुख कारण असल्याचं म्हटलं जातंय. ज्याला पुन्हा एकदा मोदी सरकारची चुकलेली ध्येयधोरणे व चुकीचे निर्णय कारणीभूत असल्याचे दावे अर्थतज्ज्ञांकडून केले जाताहेत. भारतीय अर्थव्यवस्थेवर सर्वात पहिला आघात केला तो पंतप्रधान मोदींच्या नोटबंदीने. या काळात रोख व्यवहारांवर विसंबून असलेले मध्यम, लघु व सूक्ष्म उद्योग, असंघटित क्षेत्रातील कामगार, औषधनिर्माण व शेती क्षेत्राशी निगडित उद्योगधंद्यांना प्रामुख्यानं फटका बसला. दुसरा आघात होता तो अव्वाच्या सव्वा आकारलेल्या वस्तू व सेवा कराचा (जीएसटी). हा कर गेल्या वर्षी (2025) दिवाळीच्या आसपास कमी करण्याची उपरती मोदी सरकारला सुचली आणि तिसरा आघात होता तो कोरोना महामारीचा. यानंतर देशातील लघु उत्पादन क्षेत्र पुन्हा सावरू शकलं नाही. या तिन्ही फटक्यांमुळं देशातील असंख्य लहान-मोठे उद्योगधंदे जे बंद झाले ते पुन्हा सुरू होऊ शकले नाहीत. साधं वृत्तपत्र क्षेत्राचं उदाहरण द्यायचं झाल्यास. कोविडच्या काळात घरोघरी बंद करण्यात आलेली वृत्तपत्रं पुन्हा कुणीही सुरू केली नाहीत. तेव्हापासून प्रिंट ऑर्डरचा घसरलेला ग्राफ अजूनही सावरू शकलेला नाही. हीच परिस्थिती इतर क्षेत्रांची झाली. मागच्या काही वर्षांत भारताची निर्यात काही प्रमाणात वाढली असली, तरी आयातीच्या तुलनेत ती तोकडीच पडत आहे. वाढता आयात खर्च आणि जागतिक व्यापारातील अस्थिरतेमुळं, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताची व्यापार तूट लक्षणीयरीत्या वाढली. एका आकडेवारीनुसार, ही तूट 2024-25 आर्थिक वर्षातील ९४.६ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत वाढून ११९.३ अब्ज डॉलर्सवर पोहोचलीय. गेल्या ११ वर्षांत नोंदवलेली ही दुसरी सर्वात मोठी व्यापार तूट आहे. या व्यापार तुटीचा भारताच्या रुपयावरही नकारात्मक परिणाम होतोय. भारतानं गेल्या वर्षी 72 अब्ज डॉलर खर्च करत 721 टन सोन्याची आयात केली होती. दरवर्षी भारत सुमारे 700 ते 800 टन सोनं आयात करतो. ही सोनं खरेदी परकीय चलनावर भार टाकत असल्यानं सोने खरेदीवरील आयात शुल्क 6 टक्क्यांवरून आता 15 टक्के करण्यात आलंय. या निर्णयामुळं सोनं खरेदीला आळा बसेल असं सरकारला वाटतंय. भारताकडं 60 दिवस पुरेल इतका इंधनसाठा आहे किंवा 703 अब्ज डॉलर्सचा परकीय चलनसाठा आहे. हा चलनसाठा पुढील 6 महिने आयातीसाठी पुरेसा ठरू शकतो, असं म्हणत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पंतप्रधान मोदींच्या आवाहनानंतर उठलेली शॉक वेव्ह कमी करण्याचा प्रयत्न केला. खरं तर त्यांनी सांगायला पाहिजे होतं की जून जवळ आलेला असताना शेतकर्यांनी युरिया वापरायचं नाही, तर त्याला सरकार नेमका कुठला पर्याय देणार आहे? यामुळं शेती उत्पन्न कमी झाल्यावर त्यावरचे उपाय काय? मध्यम वर्गानं आपल्या पैशांनी विमान प्रवास करायचा नाही, तर देशभरात बांधलेली विमानतळं ओस पडणार नाहीत का? तिथं काम करणाया कर्मचार्यांच्या रोजगाराचं काय? दागदागिने क्षेत्रात काम करणाया असंघटित कामगारांच्या उदरनिवार्हाचं काय होणार? कोविडप्रमाणं ऑनलाईन वर्ग घेऊन शिक्षणाचा दर्जा ढासळणार नाही काय? हे एकमेकांमध्ये गुंतलेले प्रश्न आहेत. त्याचे कुठलेही अर्थशास्त्रीय परिणाम जाणून न घेता मोदींनी केलेलं आवाहन देशाच्या अर्थव्यवस्थेवरच उलटू शकतं, असं अर्थतज्ज्ञांचं म्हणणं आहे. सोन्याच्या दरात तर वाढ झालेलीच आहे, पेट्रोल-डिझेलचे दर कधीही वाढतील. येऊ घातलेल्या महागाईचे हे संकेत आहेत. कदाचित हा धक्का कमी करण्यासाठीच मोदींनी काटकसरीचं आवाहन करून वातावरणनिर्मितीचा प्रयोग केला? की कमकुवत अर्थव्यवस्थेमुळं निर्माण होणाया पुढच्या आर्थिक संकटाची ही चाहूल म्हणावी? याचं उत्तर येणारा काळच देईल. कुठल्याही संकटाचा पहिला मार हा सर्वसामान्यांनाच बसत असतो, त्यामुळं या कठीण काळात सर्वसामान्यांनी सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे.

राज्यातील अनेक शहरातील फुटपाथवर व्यावसायिकांनी अतिक्रमण करून, पादचाऱ्यांपुढे गंभीर समस्या निर्माण केली

ज्यासह देशात अतिक्रमण हटविण्याची मोहीम मोठ्या प्रमाणात सुरू याचे स्वागतच.परंतु मोठमोठ्या व्यावसायिकांनी (दुकानदार, खाजगी दवाखाने, कोचिंग क्लासेस, अवैध प्रवासी वाहतूक)इत्यादी अनेक क्षेत्रातील व्यावसायिकांनी फुटपाथवर अतिक्रमण करून आपली पकड मजबूत केल्याचे दिसून येते. सरकारने बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरातील अवैध वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला आहे ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. परंतु बसस्थानकाच्या परिसरात अवैध प्रवासी वाहतूक का होते याचा विचार सरकारने कधी केला का? सरकारने टाईम-टू-टाईम बस सोंडेने, प्रवाशांची गैरसोय दूर करणे, प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसेसची संख्या वाढविणे यावर जर सरकारने नियंत्रण ठेवले असते तर अवैध प्रवासी वाहतूक बसस्थानकाच्या परिसरात दिसलीच नसती व एसटी महामंडळ संकटात सापडले नसते. परंतु सरकारचे लक्ष प्रवाशांकडे नसल्याने ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सरकार प्रवाशांना पाहिजे त्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देत नसल्याने अवैध प्रवासी वाहतूकीची परिस्थिती निर्माण झाली आहे.कारण राज्यातील अनेक भागात घंटोनघंटे बस वेळेवर पोहचत नाही यामुळे प्रवाशांची गैरसोय होते अशा परिस्थितीत प्रवासी खाजगी वाहतूकीकडे वळतांना दिसतात. त्यामुळेच आज एसटी महामंडळ संकटात सापडली आहे आणि त्याचे प्रायश्चित्त आज गोरगरीब, सर्वसामान्य व ग्रामीण प्रवाशांना भोगावे लागत आहेत याला एसटी महामंडळ व सरकार जबाबदार आहे. अशाचप्रकारे सरकारी आरोग्य सुविधा दिवसेंदिवस ढासळत असल्याने त्यांच्या आसपास खाजगी दवाखान्याचा भरमाड वाढला आहे अशा परिस्थितीत यांनी सुद्धा फुटपाथवर अतिक्रमण करून आपली पकड मजबूत करून पार्किंगसाठी वापर आहे आणि याचे प्रायश्चित्त सर्वसामान्यांना भोगावे लागत आहेत.त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत अवैध प्रवासी वाहतूकदारांनी सुध्दा फुटपाथवर आपली पकड मजबूत केल्याचे दिसून येते. आपण पहातो की, राज्यातील बहुतांश शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके, रेल्वे स्थानके, कोचिंग क्लासेस व दुकानदार यांच्याकडून फुटपाथवर अतिक्रमण करून दुरूपयोग करतांना दिसतात. याला जबाबदार स्थानिक प्रशासन व सरकार आहे आणि ह्या सर्व घटना सरकार, प्रशासन, स्थानिक प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहत आहे .फुटपाथ म्हणजे पादचाऱ्यांनी पायी चालण्याची जागा असते. परंतु सध्याच्या परिस्थितीत राज्यातील अनेक शहरांमध्ये जनुकाय व्यावसायिकांनी फुटपाथवर आपलीं मालकी केली की काय असे चित्र राज्यात सर्वत्रच दिसून येते. वाढते ट्राफीक, वाढती पार्किंगची समस्या आणि फुटपाथवर अवैध व्यवसाय यामुळे पायदळ चालणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते व याचा परिणाम दुर्घटनेमध्ये होतो हे आपण अनेकदा मिडियाच्या व वर्तमानपत्राच्या माध्यमातून पाहिले आहे. फुटपाथवरुन पादचारी चालु शकत नाही, कारण तिथे दुकाने लागली असतात, वाढत्या ट्राफीकमुळे रस्त्यांनी मोठी गर्दी असते या सर्व अडचणींमध्ये पायदळ चालणारे आबालवृद्ध, विद्यार्थी व सर्वसामान्य अडकतात अशा परिस्थितीत सर्वांनाच घरी जाण्याची घाई असते.अशा कठीण परिस्थितीत मोठ्या प्रमाणात दुर्घटना सुध्दा ओढावू शकते आणि दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत. अनेकदा पायदळ चालणाऱ्यांना मागून एखादे वाहन येते आणि दुर्घटना करून निघून जाते. यात दोषी कोण पायदळ चालणारे म्हणावे की वाहन चालविणारे! माझ्यामते यात मुख्य दोषी म्हणजे स्थानिक प्रशासन व सरकार आहे. कारण फुटपाथचा योग्य आणि सटीक उपयोग जर झाला तर आणि फुटपाथ पायदळ चालणाऱ्यांसाठी मोकळी केली तर पायदळ चालणाऱ्यांच्या ९५ टक्के दुर्घटना आपोआप थांबेल. प्रशासन वाहन चालकांचे लायसन्स किंवा हेल्मेट विचारतात मग पायदळ चालणाऱ्यांना फुटपाथवर चालण्याचे का सांगत नाही किंवा का विचारत नाही!कारण फुटपाथवर व्यावसायिकांनी पुर्णपणे अतिक्रमण केले असते.त्यामुळे सरकारने, प्रशासनाने व स्थानिक प्रशासन पायदळ चालणाऱ्यांच्या वाढत्या दुर्घटना पहाता संपूर्ण नागरिकांसाठी राज्यातील संपूर्ण शहरातील फुटपाथ मोकळी केली पाहिजे, असे माझे स्पष्ट मत आहे. मागील वर्षी एक भयावह आणि अंगावर शहारे येणारी घटना घडली. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी मार्गावरील काटली गावानजीक अल्पवयीन सहा मुले पहाटे ५.३० च्या दरम्यान मॉर्निंग वॉकला निघाली असता अचानक भरधाव मालवाहू ट्रकने ६ मुलांना चिरडले यात ४ मुलांचा वेदनादायक मृत्यू झाला व दोन गंभीर जखमी झाले होते. यावरून आपण समजू शकतो की पायदळ किंवा मॉर्निंग वॉक करने सुरक्षित नाही म्हणजेच घराच्या बाहेर निघतांना जीव मुठीत घेऊन निघावे लागते. फुटपाथवर चालनारा असो अथवा रोडच्या कडेला चालनारे असो यांना सुध्दा दुर्घटनेने सोडले नाही. त्यामुळे काही कारण नसताना दुर्घटना किंवा काही चूक नसतांना पायदळ चालणाऱ्यांच्या भयावह दुर्घटना होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. यावर सरकारने व स्थानिक प्रशासनाने ताबडतोब अंकुश लावने गरजेचे आहे.

आरोग्य आणीबाणी



पृथ्वीचे सरासरी तापमान गेल्या दशकापासून दरवर्षी नवनवे विक्रम मोडीत काढत आहे. सद्यस्थिती पाहता हा उन्हाळा आजवरच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण उन्हाळा ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उन्हाळ्यात असह्य उष्ण लहरी, हिवाळ्यात अचानक येणारी थंडीची लाट आणि मान्सूनमध्ये ढगफुटीसदृश वादळी पाऊस हे आता ऋतुचक्राचे कायमचेच विस्कळीत झालेले रूप बनले आहे. हवामान बदलाचा हा मार केवळ निसर्गाच्या नोंदींपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आपल्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. मानवी आरोग्य, मुके प्राणी, शहरी वन्यजीव आणि महाराष्ट्राचे भौगोलिक भवितव्य या तापमान वाढीच्या विळख्यात पुरते होरपळून निघत आहे. ध्या देशभरात उन्हाचा पारा सातत्याने नवनवे उच्चांक गाठत असून, उत्तर भारतासह अनेक राज्यांमध्ये भीषण उष्णतेची लाट पसरली आहे. दिल्ली-एनसीआरसह अनेक शहरांमधून समोर येणारी आकडेवारी केवळ अंगाची लाहीलाही करणारी नाही, तर मानवी आरोग्यासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारी आहे. आजवर आपल्याला उन्हाळ्यातील आजार म्हणजे केवळ अस्वस्थता, घाम येणे, थकवा किंवा जास्तीत जास्त ह्यसनस्ट्रोकह्न इतकेच माहीत आहे; मात्र यंदा उन्हाळ्याने धारण केलेले रौद्ररूप आणि वैद्यकीय तज्ज्ञांनी दिलेले इशारे पाहता, हा ऋतू आता सार्वजनिक आरोग्य आणीबाणी निर्माण करत आहे. या भीषण हवामानाचा परिणाम थेट ह्यमज्जासंस्थाह्न आणि दृष्टीवर होत असल्याचे वैद्यकीय अहवालांमधून सिद्ध होत आहे. या पार्श्वभूमीवर, वाढत्या तापमानाचे मानवी शरीरावरील होणारे आघात समजून घेणे आणि त्याविरुद्ध वेळीच व्यापक पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. या बदलत्या आणि अत्यंत आक्रमक बनलेल्या उन्हाळ्याच्या आजारांचे स्वरूप पूवीर्पेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. दिल्लीच्या आघाडीच्या रुग्णालयांमधील ओपीडीमध्ये केवळ उन्हामुळे आजारी पडणाऱ्या रुग्णांच्या संख्येत तब्बल २० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, या रुग्णांमध्ये ताप, जुलाब किंवा उलट्या यांसारख्या पारंपरिक लक्षणांपेक्षा ह्यन्यूरोलॉजिकलह्न संबंधित गंभीर आजारांची गुंतागुंत घेऊन येणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. देशातील ज्येष्ठ न्यूरोलॉजिस्टनी स्पष्ट केल्यानुसार, ह्यलूह्न आणि अतिउष्णतेचा थेट संबंध आपल्या मेंदूच्या कार्यप्रणालीशी आहे. मानवी शरीर अंतर्गत तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी एका विशिष्ट मयार्देपर्यंत संघर्ष करू शकते; परंतु जेव्हा बाहेरील तापमान सातत्याने ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्या पार जाते आणि व्यक्ती प्रदीर्घ काळ या वातावरणाच्या संपर्कात राहते, तेव्हा शरीराचे हे अंतर्गत संतुलन कोलमडून पडते. अतिउष्णतेमुळे शरीराला मोठ्या प्रमाणावर घाम येतो. या घामाच्या वाटे केवळ पाणीच नाही, तर शरीरातील अत्यंत महत्त्वाचे इलेक्ट्रोलाइट्स वाहून जातात. शरीरात निर्माण होणारी ही पाण्याची तीव्र कमतरता आणि इलेक्ट्रोलाइट्सचे बिघडलेले संतुलन थेट मेंदूच्या रक्तप्रवाहावर परिणाम करते. मेंदूला होणारा रक्तपुरवठा मंदावल्यामुळे किंवा विस्कळीत झाल्यामुळे तंत्रिका तंत्रावर कमालीचा ताण येतो. याचे सद्यस्थितीत ओपीडीमध्ये दिसणारे परिणाम म्हणजे तीव्र डोकेदुखी, सतत चक्कर येणे, व्यक्तीला आजूबाजूच्या परिस्थितीचा अचानक विसर पडणे किंवा मानसिक भ्रम होणे हे आहेत.

अनेक कमकुवत रुग्ण, वृद्ध आणि लहान मुले भर उन्हात किंवा पुरेशी हवा नसलेल्या ठिकाणी अचानक बेशुद्ध पडत आहेत. इतकेच नव्हे तर, अतितापमानामुळे मेंदूतील विद्युत लहरींचे नियंत्रण सुटून रुग्णांना झटके येण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. या लक्षणांकडे केवळ उन्हाळ्याचा थकवा म्हणून दुर्लक्ष करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते; कारण ही न्यूरोलॉजिकल आणीबाणी असून, यामध्ये तत्काळ वैद्यकीय उपचार न मिळाल्यास रुग्णाच्या जीवाला कायमचा धोका निर्माण होऊ शकतो. या महातापमानाचा दुसरा मोठा फटका आधीपासूनच विशिष्ट आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना बसत आहे. मायग्रेन, अपस्मार किंवा नसांच्या जुन्या विकारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी हा उन्हाळा एका छळासारखा ठरत आहे. अतिउष्णतेचे दिवस आणि त्याहूनही अधिक त्रासदायक असणाऱ्या उष्ण रात्री यामुळे रुग्णांची झोप पूर्ण होत नाही. अनेक भागांत होणारी वीज कपात या त्रासात भर घालत आहे. अपुऱ्या झोपेमुळे आणि सततच्या शारीरिक ताणामुळे मायग्रेनच्या रुग्णांमध्ये डोकेदुखीची वारंवारता आणि तीव्रता कमालीची वाढली आहे. अपस्माराच्या रुग्णांमध्ये झटके येण्याचे प्रमाण उन्हाळ्यात वाढते, कारण त्यांचे शरीर अंतर्गत उष्णतेचा ताण सहन करू शकत नाही. मज्जासंस्थेइतकाच उन्हाचा थेट आणि मोठा मारा आपल्या नाजूक डोळ्यांवर होत आहे. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे, हवेतील उष्ण वारे, वाढती धूळ आणि प्रदूषण डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. नेत्ररोग तज्ज्ञांच्या मते, या ऋतूत ह्यड्राय आय सिंड्रोमह्नच्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. डोळ्यांमधील पाण्याचा थर उन्हामुळे वेगाने सुकतो, ज्यामुळे डोळ्यांची जळजळ होणे, डोळे लाल होणे, सतत खाज सुटणे आणि डोळ्यांवर प्रचंड ताण येणे अशा समस्या उद्भवतात. उष्ण हवेतील धुळीच्या कणांमुळे ह्यऑलर्जिक कंजंक्टिव्हायटिसह्न म्हणजेच डोळे येण्याची साथ पसरत आहे. या वाढत्या संकटाचा सामना करण्यासाठी आता केवळ शासकीय पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन पुरसे ठरणार नाही, तर प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक पातळीवर आरोग्याची शिस्त लावावी लागेल. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिलेले सल्ले आता मार्गदर्शक तत्त्वे म्हणून स्वीकारण्याची वेळ आली आहे.

अपात्री ओवाळणी



राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेतील तब्बल ८० लाख लाभार्थी अपात्र ठरल्यामुळे त्यांना राज्य सरकारकडून दरमहाची दीड हजार रुपयांची ओवाळणी बंद होणार आहे; परंतु सुरुवातीपासूनच या योजनेत खातरजमा न करता सरसकट पैसेवाटपाची घाई आणि आता तिजोरीवर आलेला ताण पाहता कधी ना कधी ही वेळ येणारच होती. योजनेच्या प्रारंभी लाभार्थींची संख्या जवळपास अडीच कोटींपर्यंत गेली होती. अन्य योजनांचा लाभ घेणाऱ्या किंवा घरी चारचाकी वाहन असलेल्या म्हणजेच सधन कुटुंबातील महिलांनीही याचे लाभ घेतले. काही सरकारी कर्मचारी वा निवृत्ती वेतनधारकांनीही यातून पैसा काढला आहे; इतकेच नव्हे तर बहिणींचे पदर ओढून काही भाऊसुद्धा या महिला लाभार्थींच्या यादीत शिरल्याची धक्कादायक बाबही आता उघड झाली आहे! आता हे सर्व जण अपात्र ठरून, त्यांच्याकडून पैसेही वसूल करण्यात येणार आहेत. ही अशी वसुली व्हावीच; पण अपात्रांना लाभ देताना कोणतीही पडताळणी-खातरजमा न करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कडक कारवाई झाली पाहिजे. कदाचित निवडणुकीपूर्वी 'फार कडक पडताळणी करू नये,' अशा 'तोंडी सूचना'ही त्यांना दिलेल्या असू शकतात. खरे तर योजनेतील गैरप्रकारांचा मुद्दा विरोधकांनीही लावून धरायला हवा; पण गेल्या काही काळात राज्यात सत्ताधारी कोण आणि विरोधक कोण, हेच समजेनासे झाले आहे. त्यातच लाभार्थी बहिणींची खप्पामर्जी नको, म्हणूनही त्यांच्या विरोधाची धार बोथट होत असावी. या छाननीनंतर दरमहा बाराशे कोटी रुपयांची बचत होईल, अशी सरकार पाठ थोपटून घेईल; पण काही हजार कोटी आजवर अपात्रांना दिले, याची जबाबदारी कोण घेणार? मुळात अशा रेवडी योजना सरकारी तिजोरीसाठी अनर्थकारी ठरत असून, त्या राबवणारी बहुसंख्य राज्ये कर्जाच्या खाईत गेली आहेत. सर्वोच्च न्यायालय आणि आर्थिक पाहणी अहवालातही त्यावरून सरकारांचे कान टोचण्यात आले आहेत; तसेच या योजनेवर होणाऱ्या जवळपास ३६ हजार कोटी रुपयांच्या खर्चामुळे अन्य विभागांच्या विकासकामांनाही कात्री लागली आहे. मात्र लोकानुनयाची धुंदी आणि दीर्घकालीन विकासाची विस्मृती झालेल्यांना समजावणार तरी कोण?

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १६ जुन २०२६ ते २२ जुन २०२६

नागपूरच्या दर्ग्यात महिलेचा विनयभंग आणि धर्मांतरासाठी सक्ती... ६ जणांवर गुन्हा



उरूससाठी नागपुरात आगमन, अन् घडला धक्कादायक प्रकार

: पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला पश्चिम बंगालमधील कोलकात्याच्या दमदम परिसरातील रहिवासी आहे. ती १८ एप्रिल रोजी नागपूरजवळील हुजूर मरियम अम्मा दर्ग्यात आयोजित वार्षिक उरूस उत्सवात सहभागी होण्यासाठी आली होती. महिलेच्या तक्रारीनुसार, १८ ते १९ एप्रिलदरम्यान तिला दर्गा परिसरात जबरदस्तीने रोखून ठेवण्यात आले. याच काळात तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. धर्मांतरास नकार दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा धमक्या देण्यात आल्याचा आरोपही तिने केला आहे.

नागपूर। नागपूर जिल्ह्यातील एका दर्ग्यात घडलेल्या कथित सक्तीच्या धर्मांतराच्या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. कोलकाता येथून उरूस उत्सवासाठी आलेल्या एका महिलेने दर्ग्यातील काही व्यक्तींवर सक्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न, विनयभंग, धमक्या आणि बेकायदेशीरपणे डांबून ठेवल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी दर्ग्याच्या मुख्य काळजीवाहकासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे.

- **शारीरिक आणि मानसिक छळाचा आरोप :** पीडित महिलेने आपल्या तक्रारीत शारीरिक व मानसिक छळ झाल्याचा तसेच विनयभंग झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. काही आरोपींनी तिच्यावर दबाव टाकत धर्मांतराची प्रक्रिया स्वीकारण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केल्याचे तिने म्हटले आहे. घटनास्थळावरून कसाबसा सुटका करून घेतल्यानंतर ती कोलकात्याला परतली. तेथे वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर तिने दमदम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.
- **झिरो एफआयआरनंतर नागपुरात गुन्हा दाखल :** महिलेची तक्रार प्रथम कोलकात्यात झिरो एफआयआर म्हणून नोंदवण्यात आली. त्यानंतर प्रकरण संबंधित अधिकारक्षेत्रात येत असल्याने ते नागपूर ग्रामीणमधील कान्हान पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले. नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोहरे यांनी सांगितले की, तक्रार प्राप्त होताच तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. पीडितेचा सविस्तर जबाब नोंदवण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक कोलकात्याला पाठवण्यात आले आहे.
- **सहा आरोपींवर गंभीर कलमांखाली गुन्हा :** तक्रारीच्या आधारे कान्हान पोलिसांनी हल्ला, विनयभंग, धमकी, हत्येचा प्रयत्न आणि सक्तीच्या धर्मांतरासंदर्भातील विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपींमध्ये ताजी जनवीरद्दीन, ताजी मुस्तफाफिरुद्दीन फैज, तेजस खोब्रागडे, बशरा फातिमा ताजी, मल्ला धुळे आणि अन्य एका व्यक्तीचा समावेश आहे. आरोपींपैकी दोन महिला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.
- **एसआयटी मार्फत तपास; इलेक्ट्रॉनिक पुरावे जप्त :** प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. तपासादरम्यान काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली असून ती न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहेत. या तपासातून आणखी महत्त्वाचे पुरावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या घटनेमुळे नागपूरसह राज्यभरात चचेर्ला उधाण आले असून पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

नाशिकचा आणखी एक भामटा ज्योतिषी समोर

'ज्योतिषा'चे थेट दुबई कनेक्शन



नागपूर । नाशिक पोलिसांच्या रडारवर सध्या एक नाव चर्चेत आहे ते म्हणजे सचिन देशमुख! स्वतःला ज्योतिषी म्हणवणारा, हनुमान भक्त असल्याचा दावा करणारा हा व्यक्ती आता एका मोठ्या आर्थिक घोटाळ्यामुळे पोलिसांना हवा आहे. कारण, श्रद्धा आणि भविष्याच्या नावाखाली त्याने शेकडो लोकांना कोट्यवधींचा गंडा घातल्याचा आरोप आहे.

नाशिकमध्ये अंजनीय ज्योतिष नावाने कार्यालय

नाशिकमधील शरणपूर रोड परिसरात 'अंजनीय ज्योतिष' नावाने कार्यालय चालवणाऱ्या सचिन देशमुखने लोकांचा विश्वास जिंकला. भविष्य सांगण्याच्या माध्यमातून त्याने अनेकांना शेअर मार्केटमध्ये मोठ्या परताव्याचं आमिष दाखवलं. विश्वास इतका बसला की तब्बल 321 जणांनी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक त्याच्या माध्यमातून केली. ही रक्कम काही लाखांत नव्हती तर ती थेट 36 कोटी 32 लाख रुपये होती. मात्र धक्कादायक बाब म्हणजे, ही रक्कम शेअर मार्केटमध्ये गुंतवलीच गेली नाही. उलट हा पैसा हडप करण्यात आल्याचं सायबर पोलिसांच्या तपासात समोर आलं आहे. या प्रकरणाचा पहिला संशय एका किराणा दुकानदाराला आला. देशमुखने त्यालाही शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडत तब्बल 73 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. संशय आल्यावर दुकानदाराने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि त्यानंतर या संपूर्ण घोटाळ्याचा पदार्फाश झाला.

सचिन देशमुख विरोधात लूकआऊट नोटीस

धक्कादायक म्हणजे, तक्रारींचा आकडा वाढतच गेला. आतापर्यंत 329 जणांच्या तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या असून, फसवणुकीची व्याप्ती दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. दरम्यान, पैसे घेऊन सचिन देशमुख फरार झाला असून तो दुबईत लपल्याचा पोलिसांना संशय आहे. त्याच्या विरोधात लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली असून सायबर पोलीस त्याच्या मागावर आहेत. श्रद्धा, ज्योतिष आणि मोठ्या नफ्याचं आमिष या तिन्ही गोष्टींचा वापर करून लोकांना जाळ्यात ओढल्याचा आरोप असलेल्या या प्रकरणामुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

कल्याणमध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर!



जोशीबाग परिसरात तरुणीसोबत भररस्त्यात गैरवर्तन; स्थानिक नागरिकांनी आरोपीचा शोध लावत पोलिसांच्या केले हवाली

कल्याण। कल्याणमध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरातील जोशीबाग परिसरात एका तरुणीसोबत भररस्त्यात गैरवर्तन केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून पोलिसांनी या प्रकरणी एका तरुणाला बेड्या ठोकल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, एक २२ वर्षीय तरुणी नेहमीप्रमाणे तिच्या कामावर जाण्यासाठी निघाली होती. ती जोशीबाग परिसरातून जात असताना अचानक एक तरुण तिच्यासमोर आला. त्याच्या संशयास्पद हालचाली आणि वागण्यामुळे तरुणी प्रचंड घाबरली. याच दरम्यान त्या तरुणाने तरुणीसोबत भररस्त्यात गैरवर्तन केले. हा प्रकार घडताच आरोपीने तिथून पळ काढला. हा धक्कादायक प्रकार परिसरातील काही नागरिकांच्या नजरेस पडला. भररस्त्यात तरुणीसोबत असे कृत्य होत असल्याचे पाहून स्थानिक नागरिक संतप्त झाले. त्यांनी तातडीने आरोपीच्या दिशेने धाव घेत त्याचा पाठलाग सुरू केला. सुरुवातीला तो गदीर्चा फायदा घेऊन पसार होण्यात यशस्वी ठरला होता. मात्र, नागरिकांनी हार न मानता स्थानिक लोकांच्या मदतीने त्याचा शोध सुरू ठेवला. अखेर नागरिकांनी त्याला शोधून काढले आणि थेट पोलिसांच्या हवाली केले. प्रथमेश जाधव असे या अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेनंतर पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे महात्मा फुले पोलिसांनी आरोपी प्रथमेश जाधव याच्याविरोधात रीतसर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी त्याला अटक केली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. भररस्त्यात एका मुलीसोबत असा प्रकार घडल्यामुळे स्थानिक महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सार्वजनिक ठिकाणी महिला सुरक्षित आहेत का, असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

नाशिकमध्ये माणुसकी ओशाळली!

70 वर्षीय नराधमाचा 15 वर्षीय मुलीवर अत्याचार, घटनेनं संताप



नाशिक। नाशिकमध्ये 70 वर्षीय वृद्धाकडून त्याच्याच घरात असलेल्या केअरटेकर असलेल्या महिलेच्या नातीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली असून, मुंबई नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई नाका पोलिस ठाणे हद्दीत केअरटेकर नागार, अशोक मार्ग येथे राहणाऱ्या सांशयिता 70 वर्षीय सूर्यकांत वाघ उर्फ अण्णा या नराधम वृद्धाने त्याच्याच घरी कामाला असणाऱ्या केअरटेकर वृद्धेच्या 15 वर्षीय नातीवर लैंगिक अत्याचार केला. घरातील एका बंद खोलीत पीडित अल्पवयीन मुलीला नेऊन तिचे तोंड दाबून अत्याचार करण्यात आला. या प्रकरणी मुंबईनाका पोलिस ठाण्यात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंचवटी भागात राहणारी पीडित मुलगी आणि तिची आजी मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात. पीडितेची आजी ही संशयित वृद्ध वाघ याच्या घरी 'केअरटेकर' म्हणून काम करत होती. याच काळात संशयित सूर्यकांत वाघ याने पीडित मुलीला एका खोलीत नेऊन तिच्यावर अत्याचार केले. तसंच नंतर तिला धमकीही दिली. या धाकामुळे पीडितेने प्रदीर्घकाळ हे भयानक वास्तव कोणालाही सांगितले नाही. घाबरलेल्या पीडित अल्पवयीन मुलीने अखेर प्रकरणाला वाच्यता फोडली आणि मुंबई नाका पोलिसांत याबाबत तक्रार दाखल केली.

पीडितेने दिलेल्या फियार्दीहून मुंबई नाका पोलिस ठाण्यात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच नाशिकच्या इंदिरानगर आणि अंबड पोलिस ठाणे हद्दीत देखील अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या घटनांबाबत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. इंदिरानगर परिसरातील धोंगडे नगर, आनंद नगर नाशिक येथे सुनील कुमार लालदा प्रसाद यादव (वय ३६) या नराधमाने दिनांक १४ मे रोजी १ वाजेच्या सुमारास परिसरातील एका मंडपामागे अल्पवयीन मुलीला घेऊन जाऊन तिचा विनयभंग करण्यात आला, त्यानंतर पीडित मुलीने तिच्या घरच्यांना सर्व प्रकार सांगितला. तिच्या घरच्यांनी दिलेल्या फियार्दीहून नाशिकच्या इंदिरानगर पोलिस ठाण्यात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिसरा गुन्हा हा अंबड पोलिस ठाणे हद्दीत घडला आहे. सह्याद्री नगर, सिडको येथे २१ वर्षीय संशयित आरोपी याने त्याच्याच चुलत अल्पवयीन बहिणीवर दिनांक २१ एप्रिल ते ११ मे २०२६ पर्यंत तिच्या आई वडिलांना मारून टाकण्याची धमकी देत तिच्यावर अत्याचार केले. या प्रकरणी अंबड पोलिस ठाणे येथे फियार्दी यांच्या पुतण्यावर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मानपाडा पोलिसांची तत्परता; रिक्षात विसरलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने केले हस्तगत



पोशि/७५८८ पंढरीनाथ सांगळे यांनी सपोफौ सुनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक माहिती आणि कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे संबंधित रिक्षाचा शोध घेतला. त्यानंतर रिक्षाचालकाकडून सदर बॅग हस्तगत करण्यात आली.यानंतर मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांच्या हस्ते सदर बॅग तक्रारदार महिलेला सुपूर्त करण्यात आली. मानपाडा पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ठाणे । उपचारासाठी आणलेली ५० हजारांची रोख रक्कम आणि सुमारे चार तोळे सोन्याचे दागिने असलेली बॅग रिक्षामध्ये विसरलेल्या महिलेस मानपाडा पोलीसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोधून परत मिळवून दिली. पोलिसांच्या या तत्पर आणि कौतुकास्पद कामगिरीमुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला उपचारासाठी जात असताना रिक्षामध्ये आपली बॅग विसरून उतरल्या होत्या. काही वेळानंतर बॅग हरवल्याचे लक्षात येताच त्यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. बॅगेमध्ये ५० हजार रोख रक्कम तसेच अंदाजे चार तोळे सोन्याचे दागिने असल्याने पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला.

बीडमधील धक्कादायक प्रकार!

अत्याचार पीडित चिमुरडीला रुग्णालयात १० तास बसवून ठेवलं...

संतापजनक घटनेमुळे आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

नात्याला कलंक! नराधम चुलत मामे भावाकडून अल्पवयीन मुलीवर बलात्कार

मिळालेल्या माहितीनुसार, हा संतापजनक प्रकार बीडच्या केज उपजिल्हा रुग्णालयात घडला असून, यामुळे आरोग्य विभागाच्या एकूणच कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एका अल्पवयीन मुलीवर तिच्याच नात्यातील चुलत मामे भावाने अत्याचार करून नात्याला कलंक फासला. बीडच्या केज पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या एका गावामध्ये मंगळवारी ही घटना घडली. नराधम भावाने पीडित चिमुरडीचे तोंड रुमालाने दाबले आणि तिचे हात दोरीने बांधून तिच्यावर बळजबरीने बलात्कार केला. या धक्कादायक प्रसंगामुळे पीडित मुलगी प्रचंड मानसिक धक्क्यामध्ये होती.

बीड। बीड जिल्हा सध्या गुन्हेगारीच्या विळख्यात सापडला आहे. गुन्हेगारीचा हा आलेख वाढत असतानाच, आता जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचा अत्यंत धक्कादायक चेहरा समोर आला आहे. बीडमध्ये एका अल्पवयीन चिमुरडीवर अत्याचार झाल्याची संतापजनक घटना घडली. मात्र, त्याहूनही भीषण आणि चीड आणणारी बाब म्हणजे, वैद्यकीय तपासणीसाठी या पीडित मुलीला उपजिल्हा रुग्णालयात तब्बल १० तास ताटकळत राहावे लागले. प्रशासनाच्या या निर्दयी कारभारामुळे संपूर्ण परिसरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

गुन्हा दाखल करायला लागली अख्खी रात्र; पोलिसांचा संथ कारभार

हा अंगावर काटा आणणारा प्रकार समोर आल्यानंतर पीडितेच्या हवालदिल झालेल्या कुटुंबियांनी तातडीने पोलीस ठाण्याकडे धाव घेतली. अधिकृत तक्रार आणि गुन्हा दाखल करण्यासाठी पीडितेसह तिचे नातेवाईक रात्री ९ वाजताच केज पोलीस स्टेशनमध्ये पोहोचले होते. मात्र, पोलिसांच्या संथ कारभारामुळे रात्री ९ वाजेपासून पीडितेचे कुटुंब तिथेच बसून होते. अखेरीस पहाटे ५ वाजता या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. म्हणजेच, गुन्हेगाराला तात्काळ अटक करण्याऐवजी पीडितेच्या कुटुंबाला अख्खी रात्र पोलीस स्टेशनमध्येच काढावी लागली.

तपासणीसाठी पीडित चिमुरडी १० तास रुग्णालयात

अगोदरच बलात्काराच्या गंभीर धक्क्यामध्ये असलेल्या चिमुरडीला आणि तिच्या कुटुंबाला पोलीस प्रशासनानंतर वैद्यकीय प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचा सामना करावा लागला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी बीडच्या केज उपजिल्हा रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयातील प्रशासनाचा ढिसाळ कारभार येथेही थांबला नाही. रुग्णालयात महिला स्त्रीरोगतज्ञ उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करण्यात आले. या कारणास्तव पीडित मुलीला चक्क सकाळी ११ वाजेपासून रात्री ९ वाजेपर्यंत रुग्णालयातच थांबवून ठेवण्यात आले. अल्पवयीन बलात्कार पीडितेला वैद्यकीय तपासणीसारख्या संवेदनशील प्रक्रियेसाठी तब्बल १० तास हॉस्पिटलमध्ये ताटकळत ठेवल्यामुळे आरोग्य विभागाच्या क्रूरतेची परिसीमा गाठली गेली. या संदर्भात जेव्हा माध्यम प्रतिनिधी आणि नातेवाईकांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे विचारणा केली, तेव्हा ₹स्त्रीरोगतज्ञ उपलब्ध नाही₹ आणि ₹कॉल डॉक्टर वेळेत उपस्थित झाले नाहीत₹ अशी उडवाउडवीची कारणे देण्यात आली.

आधी पोलीस स्टेशनमधील दिरंगाई आणि त्यानंतर आरोग्य विभागाचे पाषाण हृदयी कृत्य, यामुळे पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबाची प्रचंड मानसिक छळवणूक झाली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणारे पोलीस आणि जीव वाचवणारे आरोग्य विभाग, या दोन्ही यंत्रणांच्या अशा ढिसाळ आणि असंवेदनशील कारभारामुळे बीड जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणातील दोषी डॉक्टरांवर आणि बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई कधी होणार? असा सवाल आता सामान्य जनता विचारत आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com